मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष- नागपूर विभागाकडून
उपचाराकरिता <u>देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याबाबत</u>.

महाराष्ट्र शासन
मुख्यमंत्री सचिवालय,
क्रमांक: मुमंसनि-२०१५/प्र.क्र.०२/निधी कक्ष,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक डिसेंबर, २०१५

## प रि प त्र क

अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांकरिता येणाऱ्या खर्चासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील "**मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा**" मार्फत रुग्णांना आर्थिक मदत करण्यात येते. मुख्यमंत्री सचिवालयात यासंदर्भात मदत मिळण्यासाठी असंख्य अर्ज प्राप्त होतात. तथापि, या आजारांव्यतिरिक्तही जीवितास धोका असलेले आजार/ गंभीर अपघातातील अनेक रूग्ण असतात. या अनुषंगाने, राज्यातील अशा रूग्णांना उपचाराअभावी जीव गमवावा लागू नये म्हणून उपचाराकरिता त्यांना तात्काळ सहाय्य देण्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयामध्ये "**मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष- नागपूर विभाग**" स्थापन करण्यात आला आहे.

२. वैद्यकीय सहायता कक्षामध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करण्याकरिता <u>वैद्यकीय सहाय्यता कक्ष- नागपूर विभाग कार्यकारिणी समिती गठीत करण्यात येत आहे</u>. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| १.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर | सदस्य |
| २. नोडल अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | सदस्य |
| ३. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर विभाग, नागपूर | सदस्य |
| ४. जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर | सदस्य |
| ५. डॉ. के. आर. सोनपुरे, मा. मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, नागपूर | सदस्य सचिव |

३. सदर समितीची बैठक दर मंगळवारी व त्या दिवशी सार्वजनिक सुटी असल्यास त्यानंतरच्या कामकाजाच्या दिवशी होईल. तसेच समितीच्या बैठकीस वरीलपैकी किमान ३ सदस्य असणे आवश्यक राहील व त्यापैकी अनुक्रमांक २ अथवा ३ पैकी एका सदस्याची उपस्थिती अनिवार्य राहील. तथापि, प्रकरणपरत्वे जर रुग्णाला अर्थसहाय्य करण्याची तातडी असेल तर, समितीचे सदस्य चक्रीय पध्दतीने त्यासंबंधी निर्णय घेतील. मुख्यमंत्री सचिवालयातील आरोग्य कक्षास प्राप्त सर्व अर्जांची छाननी तसेच लाभार्थ्यांच्या पात्रतेकरिता मुख्यमंत्री सहायता निधीचे सर्व निकष लागू राहतील.

४. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अर्जांकरिता पात्र ठरणाऱ्या नागरिकांना मदत करण्यात येईल.

| अ.क्र. | आजाराचे नांव | रूग्णाची पात्रता | वैद्यकीय सहाय्याकरिता देण्यात येणाऱ्या मदतीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | हृदयरोग शस्त्रक्रिया | राजीव गांधी जीवनदायी योजनेमधील लाभार्थी वगळून इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्ण (वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी) | रु. २ लाख पर्यंत |
| २. | ट्रॉमा | संबंधित डॉक्टरांनी प्रमाणित केल्याप्रमाणे रस्त्यावरील भीषण अपघातामध्ये गंभीर | रू. १ लाख पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जखमी झालेली व्यक्ती (मुख्यत्वे करून डोक्याला गंभीर इजा झालेली व्यक्ती) | |
| ३. | कॅन्सर (सर्व प्रकार) | राजीव गांधी जीवनदायी योजनेममधील लाभार्थी वगळून इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्ण (वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी) | रू. २ लाख पर्यंत |
| ४. | सेरेब्रो व्हॅस्कुलर ॲक्सिडंट (CVA) | • वय ५० वर्षे पेक्षा कमी<br>• आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्ण (वार्षिक उत्पन्न रु. १ लाख पेक्षा कमी) | रू. २ लाख पर्यंत |

उपरोक्त नमूद आजारांकरिता रुग्णास त्यापुढील रकान्यामध्ये दर्शविलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेची मदत करावयाची असल्यास त्यासंबंधीचे संपूर्ण अधिकार हे **मा.मुख्यमंत्री यांचे स्वेच्छाधिकार** असतील.

५. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातून मदत हवी असल्यास पात्र रुग्णांनी **मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष-नागपूर विभाग, मुख्यमंत्री सचिवालय, हैद्राबाद हाऊस, सिव्हील लाईन्स, नागपूर (दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६५३९२)** येथे संपर्क साधावा.

सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

वैशाली पाटिल.
सहाय्यक संचालक, निधी व लेखा
**मुख्यमंत्री सचिवालय**

प्रत-

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ सचिव,
२. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव,
४. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
५. मुख्यमंत्री सचिवालयातील सर्व अधिकारी,
६. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
७. नोडल अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर
८. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर विभाग, नागपूर
९. जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर ,
१०. वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई,
११. सर्व मंत्रालयीन विभाग,
१२. निवड नस्ती.